# मुख्य महानगर दंडाधिकारी, एस्प्लनेड, मुंबई

वाचा : १) या कार्यालयाचे पत्र क्र. अे/गोपनिय/१०५७/२०१३,दिनांक ३०.११.२०१३ आणि पत्र क्र.अे/गोपनिय/१२०/२०१४, दिनांक ०१.०२.२०१४.
२) माननीय उच्च न्यायालय, मुंबई पत्र क्र.बी(जन)५६०१/५७/२०१४/१९९ दिनांक २१.०२.२०१४.
३) माननीय उच्च न्यायालय, मुंबई पत्र क्र.बी(जन)५६०१/५७/२०१५/११३२ दिनांक ०७.१२.२०१५.
४) माननीय उच्च न्यायालय, मुंबई पत्र क्र.बी(जन)५६०१/५७/२०१६/१६७८ दिनांक २२.१२.२०१६.

## कार्यालयीन आदेश

(क्र.आस्था१६/ ६०० /२०१७ दिनांक २९.०४.२०१७)

उपरोक्त पत्र क्र. १ नुसार लिपिक-टंकलेखक या पदासाठी मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या निवड समितीने निवड केलेल्या उमेदवारांच्या यादीला माननीय उच्च न्यायालयाने पत्र क्र.२ अन्वये मंजूरी दिली आहे व पत्र क्र. ३ अन्वये एक वर्षाची मुदतवाढ दिली आहे. त्याप्रमाणे, माननीय उच्च न्यायालयाचे पत्र क्र.४ अन्वये आणखी एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

तरी मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई हे, या कार्यालयातील लिपिक-टंकलेखक रिक्त पदासाठी निवड/प्रतिक्षा यादीतील उमेदवार अनु.क्र. १९३ व १९५ ते २०२ यांच्या नियुक्तीचे आदेश निर्गमित करीत आहेत.

| अनु. क्र. | उमेदवाराचे नाव | निवड/प्रतिक्षा यादी क्रमांक | उमेदवाराचा पत्ता |
|---|---|---|---|
| १ | श्री. मनोज मधुकर दुसाने | १९३ | प्लॉट नं.४, वानखेडकर नगर, जी.टी.बी. स्टॉप रोड, अंबाजी चे मागे, देवपूर, धुळे, जि. धुळे. ४२४००२. |
| २ | श्री. किरण शांताराम अहिरराव | १९५ | १९/डी-१२, शिवदर्शन को. ऑप. हाउसिंग सोसायटी, अन्नपुर्णा नगर, आधारवाडी, कल्याण पश्चिम, जि. ठाणे. ४२१३०१. |

| अनु. क्र. | उमेदवाराचे नाव | निवड/प्रतिक्षा यादी क्रमांक | उमेदवाराचा पत्ता |
|---|---|---|---|
| ३ | श्री. स्वप्नील विनायक सावंत | १९६ | ए १५, गायत्री दर्शन, गणेश नगर, मानपाडा रोड, डोंबिवली पूर्व, जि. ठाणे - ४२१२०१. |
| ४ | श्री. मनोजकुमार गंगाधर बिरादर | १९७ | गुनाळे निवास, धरण रोड, उद्गीर, जि. लातूर. |
| ५ | श्री. विलास शामराव गोहाणे | १९८ * | द्वारा - उज्जवल प्रोव्हिजन, विभव नगर, आदित्य मंगल कार्यालया जवळ, वाघपूर बायपास रोड, यवतमाळ, जि. यवतमाळ. |
| ६ | श्री. अतुल दिलीप अहिरे | १९९ | सी-४४, श्री राजसारथी हाउसिंग सोसायटी, इंदिरा नगर, नाशिक - ९, जि. नाशिक. |
| ७ | श्री. जितेंद्र शिवाजी वाखरे | २०० | संत ज्ञानेश्वर नगर, मलकापूर, जि. बुलढाणा ४४३१०१. |
| ८ | श्री. भुषण प्रकाश गांगुर्डे | २०१ | त्रिरश्मी, सप्तश्रृंगी नगर, नारायण बापू नगर जवळ, जेल रोड, नाशिक रोड, नाशिक. |
| ९ | श्री. उमेश गोपिनाथ शिंदे | २०२ | द्वारा - शराफअली, बिल्डींग नं.३, रूम नं. ८, पैस रोड, भायखळा पश्चिम, मुंबई -११. |

उपरोक्त उमेदवारांची वेतननिश्चिती पीबी-१, वेतन बॅन्ड ५,२००-२०,२०० + ग्रेड वेतन रू. १९००/- सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारसी नुसार करण्यात येईल.

१. उपरोक्त उमेदवारांची नेमणूक ही तात्पुरत्या स्वरुपाची असेल.

२. उपरोक्त उमेदवारांनी कामावर रूजू होतांना मुळ शैक्षणिक व इतर प्रमाणपत्रे तसेच त्यांच्या सांक्षांकित प्रती व सदर परीक्षेचे प्रवेशपत्र (Hall Ticket) सादर करावे.

३. उमेदवारांना कामावर रुजू झाल्यानंतर सदर कार्यालयीन आदेशातील अटी व शर्तींचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र व एकनिष्ठतेचे शपथपत्र द्यावे लागेल.

४. उमेदवारांना वैद्यकीय तपासणीसाठी पाठविण्यात येईल व वैद्यकीयदृष्ट्या पात्र असल्याबाबतचे प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करणे अनिवार्य असेल.

५. उमेदवारांनी एक महिन्याची आगाऊ नोटीस दिल्याशिवाय राजीनामा दिला तर त्यांना एक महिन्याचे वेतन सरकार जमा करावे लागेल.

६. उमेदवारांना या कार्यालयाची निम्नश्रेणी व उच्चश्रेणी विभागीय परीक्षा नियमानुसार उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

७. उपरोक्त उमेदवारांनी महाराष्ट्र नागरी सेवा (इंग्रजी लघुलेखक व इंग्रजी टंकलेखक यांना प्राप्त करावयाच्या मराठी लघुलेखन/मराठी टंकलेखन नियमावलीनुसार परीक्षा सक्तीची करण्याबाबत) नियमावली १९९१ नुसार मराठी टंकलेखनाची एतदर्थ मंडळाची परीक्षा नियमानुसार उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

८. उपरोक्त उमेदवारांना शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१.१०.२००५, अंनियो-१००७/१८/सेवा-४, दिनांक ०७.०७.२००७ व त्यानंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन (D.C.P.S.) लागू राहील.

९. माननीय उच्च न्यायालयाने वेळोवेळी जारी केलेल्या निर्देशानुसार उमेदवारांना आंतरजिल्हा बदली अर्ज, या कार्यालयात दोन वर्षाची सेवा पूर्ण झाल्याशिवाय करता येणार नाही.

१०. उमेदवाराची सेवा निवड/प्रतिक्षा यादीनुसार त्यांची सेवा ज्येष्ठता राहील, परंतु उमेदवार विहीत वेळेत सेवेत रुजू न झाल्यास त्याचा त्यांच्या सेवा ज्येष्ठतेवर परिणाम होईल.

११. उपरोक्त उमेदवारांना सूचित करण्यात येते की, त्यांनी दिलेली माहिती आणि जोडलेली शैक्षणिक व इतर प्रमाणपत्र चुकीची आढळल्यास त्यांना त्वरित सेवेतून कमी करण्यात येईल.

१२. उपरोक्त उमेदवाराची सेवा ही महाराष्ट्र नागरी सेवा नियम आणि माननीय उच्च न्यायालय, मुंबई यांच्या नियमाधीन असेल.

१३. जे उमेदवार या आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत मुख्य महानगर दंडाधिकारी कार्यालय, एस्प्लनेड न्यायालय, मुंबई येथे हजर होणार नाहीत अशा उमेदवारांचे नांव प्रतिक्षा यादीतून वगळण्यात येईल याबाबतची त्यांनी नोंद घ्यावी.

१४. उपरोक्त उमेदवारांस प्रवास भत्ता आणि पदग्रहण अवधी अनुज्ञेय राहणार नाही.

१५. उपरोक्त उमेदवारांस असे कळविण्यात येते की, त्यांनी या कार्यालयात कर्तव्यावर रुजू होण्यासाठी कुठल्याही कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ठिक १०.३० वाजता कार्यालयीन अधीक्षक, आस्थापना विभाग, तिसरा मजला, मुख्य महानगर दंडाधिकारी यांचे कार्यालय, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे हजर रहावे.

१६. * अनुक्रमांक १९८ (DCR100349) श्री. विलास शामराव गोहाणे यांनी या आस्थापनेवर नियुक्ती झाल्यापासून एक वर्षाचे आत कार्यालयाद्वारे घेण्यात येणारी इंग्रजी व मराठी टंकलेखन परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे, आणि या संदर्भात सदर उमेदवाराने नियुक्तीच्या वेळेस शपथपत्र लिहून देणे बंधनकारक राहील. सदरील उमेदवाराची नियुक्ती या एक वर्षाचे कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरूपाची राहील. उमेदवाराने या एक वर्षाचे आत सदरील परीक्षा उत्तीर्ण झाला नाही, तर त्याची नियुक्ती रद्दबादल ठरविण्यात येईल.

२८-०४-२०१८.

**(चकोर श्री. बाविस्कर)**
मुख्य महानगर दंडाधिकारी,
एस्प्लनेड, मुंबई.

प्रत माहितीकरता :

१. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२. प्रबंधक, मुख्य महानगर दंडाधिकारी यांचे न्यायालय, एस्प्लनेड, मुंबई.
३. कार्यालयीन अधीक्षक.
४. मुख्य लिपिक.
५. गोपनीय विभाग.
६. कार्यालयीन आदेश फाईल.
७. वेतन विभाग, मुंबई.
८. संगणक विभाग.
९. संबंधित उमेदवार.